चांदवड, दिंडोरी, निफाड दुष्काळाच्या छायेत

तालुके दुष्काळी जाहीर न झाल्याने खा. भास्कर भगरे नाराज

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील चांदवड, दिंडोरी आणि निफाड तालुक्यांतील दुष्काळसःश परिस्थितीग्रस्त गावांचा ट्रिगर-१ मध्ये समावेश करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) खासदार भास्कर भगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

हे तिन्ही विधानसभा मतदारसंघ सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडे (अजित पवार) आहेत. यातील दिंडोरी विधानसभेचे प्रतिनिधित्व अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवळ करतात. ग्रामीण भागातील हे तीन तालुके दुष्काळी यादीतून वगळल्याने खासदार भगरे यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नाशिक जिल्ह्यातील १५ पैकी १० तालुके दुष्काळी म्हणून जाहीर झाले. यात चांदवड, दिंडोरी आणि निफाडचा समावेश नाही.



दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील या तिन्ही तालुक्यांतील अनेक गावांमध्ये पावसाचे असमान वितरण, पावसातील मोठे खंड आणि पिकांना आवश्यक त्या कालावधीत पुरेसा पाऊस न झाल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित गावांचा दुष्काळ ट्रिगर-१ मध्ये समावेश करण्याबाबत खासदार भगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन मागणी केली आहे.

प्रभावित गावांची वस्तुनिष्ठ पाहणीची मागणी

चांदवड, दिंडोरी आणि निफाड तालुक्यांतील दुष्काळसदृश्य परिस्थितीने प्रभावित गावांची गावनिहाय वस्तुनिष्ठ पाहणी करून, पात्र गावांचा दुष्काळ ट्रिगर-१ मध्ये समावेश करावा, तसेच यासाठी जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी खासदार भगरे यांनी केली आहे. पाहणीअंती पात्र ठरणाऱ्या गावांना शासनाच्या दुष्काळ व नैसर्गिक आपत्तीविषयक निकषांनुसार उपलब्ध असलेल्या उपाययोजना व मदतीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

या तीनही तालुक्यांतील परिस्थितीचा विचार करताना केवळ तालुक्याच्या सरासरी पर्जन्यमानाची आकडेवारी न पाहता गावनिहाय पर्जन्यमान, पावसातील खंड, पिकांची सद्यःस्थिती, जमिनीची जलधारण क्षमता आणि उपलब्ध जलस्रोत यांचा वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार करणे आवश्यक असल्याकडे खासदार भगरे यांनी पत्रातून लक्ष वेधले आहे.

काही भागांमध्ये हलकी व डोंगराळ जमीन असून पावसातील खंडाचा पिकांवर मोठा परिणाम होत आहे.

खरीप पिकांना आवश्यक त्या कालावधीत ओलावा उपलब्ध न झाल्याने पिकांची वाढ खुंटण्याची तसेच उत्पादनात घट होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित गावांची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीची नोंद घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

निफाड तालुक्यात फेरपडताळणीची गरज

नाशिक : शासनाने जाहीर केलेल्या ट्रीगर एक तालुक्यांमध्ये निफाडचा समावेश नाही. या पार्श्वभूमीवर निफाड तालुक्यातील पर्जन्यमान, पावसाचा खंड, पिकांची प्रत्यक्ष स्थिती व उत्पादनातील संभाव्य घट याची तातडीने फेरपडताळणी करून वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे सादर करावा. तसेच येवला आणि निफाड तालुक्यातील परिस्थितीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी पीक कापणी प्रयोग प्रभावीपणे राबवावेत, असे निर्देश राज्याचे अन्न, नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी दिले.

येवला मतदारसंघातील पीक आणि दुष्काळसदृश परिस्थितीबाबत येवला येथील संपर्क कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत भुजबळ यांनी माहिती दिली. यावेळी त्यांनी महसूल, कृषी, जलसंपदा, पाणीपुरवठा, पशुसंवर्धन, महावितरण तसेच संबंधित विभागांकडून सद्यस्थितीचा आढावा घेतला. निफाड तालुक्यातील देवगाव, विंचूर, लासलगाव आणि नांदूरमध्यमेश्वर या मंडळांमध्ये पावसाचा खंड आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम याची प्रत्यक्ष पाहणी करावी.

येवला आणि निफाड तालुक्यातील पिकांच्या प्रत्यक्ष उत्पादनाचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी पीक कापणी प्रयोग निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करावेत, असे त्यांनी सूचित केले.

गावठी बंदुकांसह दोन संशयित ताब्यात

नाशिक : वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. याअंतर्गत आडगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने धडक कारवाई करत दोन गावठी बंदुका आणि आठ जिवंत काडतुसांह पोलिसांनी सुजित मोहिते (२४, रा. अमृतधाम), ओमकार बागोरे (२६, रा. लक्ष्मीनगर) यांना अटक केली.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी शहरातील गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक प्रवीण चव्हाण यांनी गुन्हे शोध पथकाला विशेष सूचना दिल्या. २३ सप्टेंबरच्या पहाटे आडगाव पोलीस ठाण्याचे हवालदार दादासाहेब वाघ यांना परिसरातील काही संशयितांकडे गावठी बंदुका असल्याची माहिती मिळाली. संशयितांकडून ७४ हजार रुपयांच्या दोन गावठी बंदुका आणि आठ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आले.

इंडियन बँक इलाहाबाद **Indian Bank** ALLAHABAD

नाशिक सिटी शाखा
पो. बॉ. १२२, ४८० वाय, जुना आग्रा रोड, मेहेर सिग्नलजवळ, नाशिक महाराष्ट्र ४२२००२ Ph.: 0253 2580496/9923591033
Email ID: nasikcity@indianbank.co.in

मागणी सुचना

कलमांतर्गत सूचना सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना १३ (२) आर्थिक मालमत्ता आणि सुरक्षा व्याज अधिनियम २००२ ची अंमलबजावणी

प्रति,

१. मे. शौर्य मोटर्स (कर्जदार) प्रोप्रायटर श्री. निशांत प्रकाशचंद्र भुतडा
पत्ता : गट नं. ६१०/३/२ व ६१०/५, सुभाष डेअरीजवळ, मुंबई–आग्रा महामार्ग, मु.पो. चंदनपुरी, ता. मालेगाव, जि. नाशिक. **तसेच**, स्वयंवर मंगल कार्यालयाजवळ, चिचखेड चौफुली, मुंबई–आग्रा रोड, पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक.

२. श्री. निशांत प्रकाशचंद्र भुतडा (प्रोप्रायटर/जामीनदार)
मु.पो. : ८, चोपडा डुप्लेक्स, कला नगर, चोपडा लॉन्सजवळ, गंगापूर रोड, नाशिक. दूरध्वनी क्र. : ०२५३–२५७६६७१

३. सौ. सरिता निशांत भुतडा (जामीनदार)
मु.पो. : ८, चोपडा डुप्लेक्स, कला नगर, चोपडा लॉन्सजवळ, गंगापूर रोड, नाशिक. दूरध्वनी क्र. : ०२५३–२५७६६७१

४. श्री. प्रकाशचंद्र गंगाभीषण भुतडा (जामीनदार/गहाणदार) (मयत) (त्यांचे कायदेशीर वारस श्री. निशांत प्रकाशचंद्र भुतडा व इतर यांच्यामार्फत)
मु.पो. : ८, चोपडा डुप्लेक्स, कला नगर, चोपडा लॉन्सजवळ, गंगापूर रोड, नाशिक.दूरध्वनी क्र. : ०२५३–२५७६६७१

५. सौ. कांचन प्रकाशचंद्र भुतडा (जामीनदार)
मु.पो. : ८, चोपडा डुप्लेक्स, कला नगर, चोपडा लॉन्सजवळ, गंगापूर रोड, नाशिक.दूरध्वनी क्र. : ०२५३–२५७६६७१

महोदय/महोदया,
विषय : इंडियन बँक, नाशिक सिटी शाखेतील आपल्या OCC Trade Well खाते क्र. ६४१८०८५९७७ आणि मुदत कर्ज खाते क्र. ६४२०५५४९७९

आपण आपले कर्ज फेडण्यात कुचराई केलेली असल्याने आपल्या कर्जखात्यावर रक्कम **रु. १०,२०,९२,८२७.००/– (रुपये दहा कोटी वीस लाख ब्याण्णव हजार आठशे सत्तावीस मात्र.) दिनांक २४.०८.२०२६** रोजी पासून संपूर्ण व्याज मुद्दल यांचा भरणाकरुन खाते बंद होईपर्यंतचे करारातील दरानुसार पुढील व्याज इतकी रक्कम आपण बँकेस देणे आहात.
सदर कायद्यातील तरतुदीनुसार बँकेने आपणास **दिनांक २४.०८.२०२६** रोजी मागणी नोटीस पाठवून येणे रक्कम **रु. १०,२०,९२,८२७.००/– (रुपये दहा कोटी वीस लाख ब्याण्णव हजार आठशे सत्तावीस मात्र.)दि. २४.०८.२०२६ रोजीपासून** इतकी रक्कम भरण्याची मागणी केलेली होती. सदर मागणी नोटीस नोंदणीकृत पोस्टने* सूचना पाठवण्यात आल्या होत्या त्या आपणास पोहोचली नसल्याने परत आलेली आहे.
आपणाकडे या नोटसीद्वारे मागणी करण्यात येत आहे की आपण येणे असलेली **रक्कम रु. १०,२०,९२,८२७.००/– (रुपये दहा कोटी वीस लाख ब्याण्णव हजार आठशे सत्तावीस मात्र.) दिनांक २४.०८.२०२६** रोजीपर्यंतच्या व्याजासह या नोटीसपासून ६० दिवसांचे आत भरणा करावी. तसे न केल्यास बँकेस सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट कायद्यानुसार प्राप्त अधिकारात सदर तारण मिळकतीबाबत आपले अधिकार / उपायांसाठी वापरुन कार्यवाही करणे भाग पडेल.
आम्ही SARFAESI कायद्याच्या कलम १३(८) च्या तरतुदींकडे लक्ष वेधत आहोत आणि तेथे तयार केलेले नियम ज्याच्या अंतर्गत सिक्युरिटीजवरील तुमच्या पूर्ततेच्या अधिकारांशी संबंधित आहे.

परिशिष्ट
ज्या मालमत्तेमध्ये सुरक्षितता व्याज निर्माण केले जाते त्या मालमत्तेचे विशिष्ट तपशील येथे दिले आहेत :

इक्विटेबल मॉर्गेज मालमत्ता : मौजे चंदनपुरी, ता. मालेगाव, जि. नाशिक येथील महसुली हद्दीत, सुभाष डेअरीजवळ, मुंबई–आग्रा रोड, चंदनपुरी शिवार येथे स्थित गट नं. ६१०/५ (पूर्वीचा गट नं. ६१०/२२) क्षेत्रफळ ८,००० चौ.मी. आणि गट नं. ६१०/३/२ (पूर्वीचा गट नं. ६१०/२/१) क्षेत्रफळ ४,००० चौ.मी., यावरील जमीन व नवीन शो–रूम मिळून असलेली संपूर्ण मालमत्ता. (सदर तारण सुरक्षा मे. मॅजिक मोटर्स, ह्युंदाई डिव्हिजन, मे. मॅजिक मोटर्स, निसान डिव्हिजन, मे. मॅजिक मोटर्स, टीव्हीएस टू–व्हीलर, श्रीरामपूर आणि मे. मॅजिक मोटर्स, टीव्हीएस, महात्मानगर, नाशिक तसेच कांचन मोटर्स यांनाही विस्तारित करण्यात आलेली आहे.)
तसेच, फर्मच्या चंदनपुरी, मालेगाव, जि. नाशिक व पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक येथील प्लांट व मशिनरी, विद्युतीकरण, फर्निचर व फिक्स्चर्स तसेच इतर मालमत्ता या स्वरूपातील चल स्थावर मालमत्तेवर (movable fixed assets) असलेला चार्ज.
गट नं. ६१०/३/२ च्या हद्दी : पूर्व : १२ फूट रुंदीचा रस्ता **पश्चिम :** गट नं. ६१०/२ चा काही भाग **दक्षिण :** गट नं. ६१०/५ चा काही भाग **उत्तर :** गट नं. ६१०/३/१ चा काही भाग
गट नं. ६१०/५ च्या हद्दी : पूर्व : १२ फूट रुंदीचा रस्ता **पश्चिम :** गट नं. ६१०/४ चा काही भाग **दक्षिण :** मुंबई–आग्रा रोड **उत्तर :** गट नं. ६१०/३/२ चा काही भाग
आणि तारण सुरक्षा : फर्मच्या चंदनपुरी, मालेगाव, जि. नाशिक व पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक येथील प्लांट व मशिनरी, विद्युतीकरण, फर्निचर व फिक्स्चर्स तसेच इतर मालमत्ता या स्वरूपातील चल मालमत्तेवर हायपोथिकेशनद्वारे निर्माण केलेला चार्ज तसेच साठा (Stocks) व बुक डेट्स (Book Debts) यांचे हायपोथिकेशन.

शाखा : नाशिक सिटी
दिनांक: २८/०९/२०२६

प्राधिकृत अधिकारी
इंडियन बँक

TATA

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत पत्ता : ११वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३.
शाखेचा पत्ता : ऑफिस क्र. ४१, चौथा मजला, बिजनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक, महाराष्ट्र-४२२००२.

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ९(१) सह वाचण्यात येणाऱ्या नियम ८(६) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) व नियम ९(१) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना.

याद्वारे आम जनतेस आणि कर्जदार/सह-कर्जदार किंवा त्यांचे कायदेशीर वारस/ प्रतिनिधी (कर्जदार) यांना सूचित करण्यात येते की, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल) यांच्याकडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल)** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी **दि. १५.१०.२०२६ रोजी 'जशी आहे जेथे आहे' व 'जशी आहे जे काही आहे' आणि 'जे काही आहे तेथेच आहे'** तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत व बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की, विक्री पुढे ढकलण्यात/खंडित करण्यात न आल्यास, सदर अनामत मत्ता/मालमत्तेची **दि. १५.१०.२०२६** रोजी **दु. २ वाजता** ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. ई-लिलावात सहभागासाठी बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट असलेला मोहोरबंद लिफाफा **१४.१०.२०२६** रोजी **सायंकाळी ५ वाजेपर्यंत** शाखेच्या पत्त्यावर म्हणजे **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, ऑफिस क्र. ४१, चौथा मजला, बिजनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक, महाराष्ट्र-४२२००२** येथे टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पोचावयास हवा. अनामत मत्ता/ अचल मालमत्तेची विक्री 'जशी आहे जेथे आहे' तत्त्वावर खाली वर्णन केलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार करण्यात येईल :

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधी/जामीनदाराचे नाव	मागणी सूचनेनुसार रक्कम आणि मागणी सूचना दिनांक	आरक्षित किंमत	या दिनांकास थकबाकी
1	TCHIN0601000100251017 & TCHHL0601000100250574 & TCHHF0601000100266422	श्री. नीरजकुमार देवेंद्र श्रीवास्तव श्रीमती नीता नीरज श्रीवास्तव	Rs.41,09,549/- 07-07-2025	रु. ३५,००,०००/- बयाणा रक्कम : रु. ३,५०,०००/- ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष	Rs.47,91,526/- 22-09-2026
अचल मालमत्तेचे वर्णन : रो हाऊस बंगला क्र. ४, प्लॉटचे क्षेत्रफळ सुमारे ९०.०० चौ.मी., सोबत तेथील सुमारे ७१.९५ चौ.मी. बिल्ट-अप क्षेत्रफळ असलेले बांधकाम, 'शिवशक्ती रो बंगलो' नावाची रो हाऊस स्कीम, प्लॉट क्र. ९५, क्षेत्रफळ सुमारे ३००.०० चौ.मी., सर्वे क्र. ३९९/१, नाशिक, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत, ता. व जि. नाशिक. **प्रकटीकरण : कर्जदाराने टीसीएचएफएल यांच्याविरुद्ध दाखल केलेला एसए (SA/247/2026) डीआरटी III, मुंबई यांच्यासमक्ष प्रलंबित आहे. सदर प्रकरणात टीसीएचएफएल यांच्याविरुद्ध स्थगनादेश पारित करण्यात आलेला नाही.**					
2	TCHHL0601000100132404 & TCHIN0601000100133826 & TCHHF0601000100378360	श्री. योगेश प्रकाश ओढेकर श्रीमती हेमलता योगेश ओढेकर	Rs.16,78,177/- 08-07-2025	रु. १५,९०,०००/- बयाणा रक्कम : रु. १,५९,०००/- ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष	Rs.20,57,365/- 22-09-2026
अचल मालमत्तेचे वर्णन : सदनिका क्र. १०, चटई क्षेत्रफळ सुमारे ३९.६० चौ.मी., तिसरा मजला, 'अथर्व कॉम्प्लेक्स:, प्लॉट क्र. ०७, क्षेत्रफळ सुमारे १५३.०० चौ.मी. आणि प्लॉट क्र. ०८, क्षेत्रफळ सुमारे २३२.०० चौ.मी., सर्वे क्र. ४२३, मौजे सायखेडा, ता. निफाड, जि. नाशिक.					

टीप : बोलीदारांना आवाहन करण्यात येते की त्यांनी बोली सादर करण्याअगोदर योग्य ती खबरदारी घ्यावी. हा लिलाव, असल्यास, वादाच्या निकालाधीन असेल.
लिलावाच्या वेळी सर्व लोकांना सामान्यपणे व्यक्तीश: बोली सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेसाठी बोली देता किंवा काही हित साधता येणार नाही. सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मध्ये विहित करण्यात आलेल्या तसेच पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल:
टीप : मालमत्तांचा ई-लिलाव हा दिनांक १५.१०.२०२६ रोजी दु. २.०० ते ३.०० वाजेपर्यंत https://XpertAuction.com या पोर्टलच्या माध्यमातून घेण्यात येईल व यात प्रत्येकी ५ मिनिटांचे मर्यादित कालविस्तार असतील.

अटी व शर्ती : १. खाली परिशिष्टात देण्यात आलेला तपशील निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून या घोषणेत काही चूक असल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार असणार नाहीत. बोलीची रक्कम अथवा बोलीदारासंदर्भात काहीही वाद निर्माण झाल्यास ती अचल मालमत्ता प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संमतीने पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **२.** सदर मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. **३.** बोली वृद्धी रक्कम **रु. १०,०००/-** (रुपये दहा हजार फक्त) असेल. **४.** सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या सर्व बोली डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील 'टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.' यांच्या नावे काढण्यात आलेल्या आणि शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या बयाणा रकमेसह सादर कराव्यात. बयाणा रकमेचा एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएसद्वारे भरणा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल. एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएसच्या माध्यमातून बयाणा रक्कम जमा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा. **५.** सर्वोच्च बोलीदार बोली देण्यास पात्र असल्यास आणि त्याने प्रस्तुत केलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसल्यास त्यास लॉटचा खरेदीदार घोषित करण्यात येईल. सर्वोच्च बोलीदाराने प्रस्तुत केलेली बोली रक्कम अत्यंत कमी वाटत असल्यास ती बोली फेटाळण्याचा अधिकार 'प्राधिकृत अधिकाऱ्यास' असेल. **६.** नमूद केलेल्या कारणांसाठी विक्री बरखास्त करण्याचा/खंडित करण्याचा अधिकार 'प्राधिकृत अधिकाऱ्या'स असेल. **७.** आधीच वेळ घेऊन **०७.१०.२०२६ रोजी स. ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत** मालमत्तेची पाहणी करता येईल. **८.** यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी घोषणा करण्यात आल्यानंतर लगेच बयाणा रक्कम धरून खरेदी किमतीच्या पंचवीस टक्के रक्कम 'प्राधिकृत अधिकाऱ्या'कडे २४ तासांच्या आत जमा करावी लागेल आणि ही रक्कम जमा न केल्यास सदर मालमत्ता पुन्हा लिलावात/खाजगी वाटाघाटीद्वारे पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **९.** वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची रक्कम जमा करण्यात आल्यास खरेदी रकमेपैकी उर्वरित देय रक्कम खरेदीदारास मालमत्तेच्या विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत 'प्राधिकृत अधिकाऱ्या'कडे जमा करावी लागेल किंवा १५व्या दिवशी रविवार किंवा सुटीचा दिवस येत असल्यास त्यापुढील दिवशी जमा करावी लागेल. **१०.** वर नमूद कालावधीत भरणा न केल्यास विक्रीची पुन्हा घोषणा करण्यात आल्यानंतर सदर मालमत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. तोवर भरलेली रक्कम टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडद्वारे जप्त करण्यात येईल अशी कसूर करणाऱ्या खरेदीदारास मालमत्तेवर किंवा पुढे त्या मालमत्तेची ज्या रकमेस विक्री करण्यात येईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा सांगता येणार नाही. **११.** मालमत्तेवरील टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना ज्ञात असलेले बोजे: वरील मालमत्तेच्या वर्णनात नमूद केल्याप्रमाणे. मालमत्तेवरील दावे आणि तिचे स्वरूप व मूल्य यावर परिणाम करू शकणारा इतर तपशील: वर नमूद केल्याप्रमाणे. इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता कर, वीज बिल इ.सह वैधानिक देणी इ.सारख्या मालमत्तेवरील बोज्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी करावी. **१२. इतर कोणताही तपशील किंवा ई-लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार आमचे सेवा पुरवठादार नवोदयन प्रॉपटेक प्रायव्हेट लिमिटेड (एक्स्पर्ट ऑक्शन), २०३, दुसरा मजला, श्याम पॅलेस, सेक्टर ४ व ५ क्रॉसिंग, रेल्वे रोड, गुरूग्राम, हरयाणा १२२००१, ईमेल आयडी- eauctions@XpertAuction.com यांच्याशी किंवा मनीष बंसल, ईमेल आयडी Manish.Bansal#tatacapital.com प्राधिकृत अधिकारी मोबाइल क्र. ८५८८९८३६९६ यांच्याशी संपर्क साधावा. १३.** सर्वोच्च घोषित करण्यात आलेल्या बोली रकमेवर सर्वोच्च बोलीदारास १% दराने टीडीएस द्यावा लागेल. हा भरणा सर्वोच्च बोलीदारास मालक/ कर्जदाराच्या पॅनमध्ये करावा लागेल आणि चलनाची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावी लागेल. **१४.** वरील तपशिलासाठी टीसीएचएफएलच्या वेबसाइटवर दिलेली https://surl.lt/eoncae ही लिंक पाहावी. **१५.** कृपया ही लिंकसुद्धा पाहावी : https://www.tatacapital.com/property-disposal.html.
कृपया लक्षात घ्यावे की, टीसीएचएफएलने या मालमत्तेच्या विक्री/लिलावासाठी वर नमूद लिलाव भागीदाराशिवाय इतर कोणत्याही ब्रोकर/एजंटची नियुक्ती केलेली नाही. कृपया इच्छुकांनी या संदर्भातील कोणत्याही चौकशीसाठी केवळ निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

स्वा/-
स्थान : नाशिक (प्राधिकृत अधिकारी),
दिनांक : २९.०९.२०२६ टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.

kotak कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी–२७, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१, (महाराष्ट्र).
शाखा कार्यालय : दुसरा मजला, अँडमास प्लाझा, १६६/१६, कोलीवेरी व्हिलेज, कुंची कुर्वेनगर, हरे कृष्णा हॉटेलमागे, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रूझ–पूर्व, मुंबई - ४०००९८.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)
(सुरक्षितता हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(१)सह वाचन करून परिशिष्ट IV नुसार)

[illegible]

घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात;

स्थावर मालमत्तेचे वर्णन
नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीतील, जिल्हा– नाशिक येथील दसक गावात, स.नं. ११/१/२/बी/२२ वर स्थित, भूखंड क्रमांक २२ क्षेत्रफळ मोजमाप ५०१.७२ चौ. मीटर (नाशिक महानगरपालिकेसाठी रस्ता रुंदीकरणाकरिता १५७.२५ चौरस मीटर क्षेत्रफळ वजा करून) उर्वरित क्षेत्रफळ ३४४.४७ चौरस मीटर आहे. त्यावर बांधलेल्या "अरहम स्पेसेस" नावाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर असलेले दुकान क्रमांक २०१, ज्याचे क्षेत्रफळ ८४.०५ चौरस मीटर (कार्पेट) अधिक १८.३९ चौरस मीटर बाल्कनी क्षेत्रफळ आहे.

सही/-
दिनांक : २४.०९.२०२६ प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : नाशिक कोटक महिंद्रा बँक लि.

TATA टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
नोंद. कार्यालय: अकरावा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३
CIN क्र.: U67190MH2008PLC187552 संपर्क क्र. (०२२) ६१८२७४१४

मागणी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ ('नियम') मधील नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ('अधिनियम') च्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत.
ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (टीसीएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी अधिनियमांतर्गत आणि नियमांमधील नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत अधिनियमाच्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत खाली नमूद दिनांकास तपशीलवार मागणी सूचना निर्गमित केलेली आहे ज्यात खाली नमूद कर्जदार/ सहकर्जदार/ जामीनदार (सर्वांचा एकत्रित किंवा स्वतंत्रपणे 'बाध्यताधारी' असा उल्लेख करण्यात येईल)/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधींना सदर निविदा सूचनेत नमूद रकमांचा भरणा खाली दिलेल्या तपशीलानुसार संबंधित सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत करण्याचे आवाहन करण्यात आले होते. सदर सूचनांच्या प्रती नोंदणीकृत पोचदेय टपालाने पाठविण्यात आलेल्या असून त्या निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध आहेत आणि सदर बाध्यताधारी/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधींची इच्छा असल्यास ते कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत निम्नस्वाक्षरीकारांकडून संबंधित प्रत प्राप्त करू शकतात.
वरील संदर्भात सदर बाध्यताधारी/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधींना पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की त्यांनी खाली त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या रकमांचा सदर बाध्यताधाऱ्यांनी तयार केलेल्या कर्ज करार व इतर दस्तावेज/ लेखांसह वाचण्यात येणाऱ्या खालील स्तंभामध्ये नमूद संबंधित दिनांकांपासून भरणा आणि/ किंवा वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या पुढील व्याजासह संबंधित सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत टीसीएचएफएलकडे भरणा करावा. कर्जाच्या परतफेडीच्या हमीदाखलसाठी अनामत म्हणून सदर बाध्यताधाऱ्यांनी खालील अनामत मत्ता टीसीएचएफएलकडे तारण म्हणून ठेवलेल्या आहेत.

कर्ज खाते क्र. : ९२६४८२८
बाध्यताधारी/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधीचे नाव : श्री. नलीनकुमार मोहन पटेल, श्रीमती [illegible]

[illegible]

दिनांक : २९.०९.२०२६ टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकरिता
स्थान : नाशिक स्वा/- प्राधिकृत अधिकारी

बैंक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

नवी मुंबई विभागीय कार्यालय :– सिडको जुनी प्रशासकीय इमारत, पी–१७ सेक्टर–१ वाशी, नवी मुंबई.
ई–मेल : bom2259@mahabank.co.in, legal_nvm@mahabank.co.in, **फोन** : ०२२–२०८७८७५१/५३

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठीची विक्री सूचना (परिशिष्ट–४–अ)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ८(६) सह ९(१)च्या तरतुदीनुसार.
याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार व जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, बँक ऑफ महाराष्ट्रकडे गहाण/प्रभारीत असलेल्या आणि बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने ताबा घेतलेल्या, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, तक्त्यात नमूद केलेल्या कर्जदार व जामीनदारांकडून बँक ऑफ महाराष्ट्रला देय असलेली थकबाकी वसूल करण्यासाठी, **दिनांक १५.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.००** या वेळेत 'जशी आहे तशी', 'जे काही आहे ते' आणि 'तेथे जे काही असेल ते' या तत्त्वावर विकल्या जातील. कर्जदार व जामीनदारांचा तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावरील ज्ञात बोजा, ताबा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खालीलप्रमाणे दिली आहे:

लॉट क्र.	शाखा	कर्जदार	जामीनदार	स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन ज्ञात बोजासह ताब्याचा प्रकार	मागणी सूचनेनुसार देय रक्कम	राखीव किंमत (रु मध्ये)
१	एआरबी नवी मुंबई	**मेसर्स श्री. भलाई ऑटो प्रायव्हेट लिमिटेड, सौ. मंजुश्री नीलेश देशमुख श्री. नीलेश विजयराव देशमुख** गट क्रमांक २८६, पिंपळनेर, सुखसागर हॉटेलसमोर, दिंडोरी, ता. दिंडोरी, जिल्हा–नाशिक–४२२२०२.	**श्री. प्रथमेश नीलेश देशमुख हमीदार** फ्लॅट क्र. ०८, कृष्ण कुंज अपार्टमेंट, चौक क्र. ०६, गोविंद नगर सिडको, नाशिक–४२२००९	नाशिक–मुंबई महामार्गावरील पांडव लेणीजवळ, पाथर्डी गाव, तालुका व जिल्हा–नाशिक, नाशिक महानगरपालिका हद्दीत असलेल्या स. नं. २६८/२/अ/५ मधील, बिगरशेती मोकळा भूखंड क्रमांक ०५, क्षेत्रफळ अंदाजे ४०००.०० चौ. मीटरचा संपूर्ण तुकडा. **ताब्याचा प्रकार:– प्रत्यक्ष**	रु. ४,६९,३२,५५५.००/– (अक्षरीः चार कोटी एकोणसत्तर लाख बत्तीस हजार पाचशे पंचावन्न फक्त) अधिक त्यावर १२.५५% व्याज दि. ०६.०७.२०२५ पासून लागू.	१९८९००००
२	एआरबी नवी मुंबई	**मे. कल्पवृक्ष ब्रीडर फार्म, श्री. रुपेश रमेश सोनावणे, मालक** गट क्रमांक १३८, पोस्ट–दसाणे, दसाणे धरणाजवळ, बागलाण, ता. बागलाण, जिल्हा–नाशिक–४२३३०१	**श्री. रमेश राजाराम सोनावणे, सौ. वैशाली रमेश सोनावणे श्री. संकेत रमेश सोनावणे** प्लॉट नं. २१, कल्पना निवास, वाखरी रोड, गुंजाळ नगर, नीलम ब्युटी पार्लरजवळ, देवळा, तालुका–देवळा, जिल्हा–नाशिक–४२३१०२.	मौजे देवळाच्या हद्दीत, तालुका देवळा, जिल्हा नाशिक स्थित, बिगरशेती भूखंड क्रमांक १५, सर्वे क्रमांक १७९/अ/३, क्षेत्रफळ ८४.०० चौ. मीटर, याचा संपूर्ण तुकडा.**ताब्याचा प्रकार:– भौतिक**	रु. १,३८,९६,२९५.२२/– (अक्षरीः एक कोटी अडतीस लाख शहाण्णव हजार दोनशे पंच्याण्णव आणि बावीस पैसे फक्त) अधिक त्यावर १२.४०% व्याज, दिनांक २८.०८.२०२५ पासून लागू.	९२००००

राखीव किमतीच्या १०% अनामत रक्कम, तपासणीची तारीख :– ०७.१०.२०२६
संपर्क तपशील:– श्री. मन मोहन मुर्मू, शाखा व्यवस्थापक, एआरबी शाखा–९५५२८०–८१८५, सुश्री सानिया खोब्रागडे, व्यवस्थापक एआरबी ९०४९३७६४४३
विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तींसाठी, कृपया बँकेच्या 'https://www.bankofmaharashtra.in/propsale.asp' वेबसाइटवर आणि E-bkray portal (www.baanknet.com) वर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.
दिनांक : २९.०९.२०२६ अधिकृत अधिकारी आणि
ठिकाण : नवी मुंबई बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई विभाग